# Hutatma Rajguru Mahavidyalaya

Rajgurunagar,Tal. Khed, Dist. Pune

---

## NSS Special Camp Report 2025-26 B017 & BSF084

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यमाने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन 24 डिसेंबर 2025 रोजी दुपारी बहिरवाडी येथे संपन्न झाले. सदरील शिबिर शाश्वत विकासासाठी युवक- पाणलोट व पडीक जमीन व्यवस्थापनया विषयाच्या माध्यमातून शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष खेड तालुक्याचे आमदार श्री. बाबाजी काळे यांच्या हस्ते पार पडला. सदरील शिबिरासाठी अध्यक्षॲडमा. श्री देवेंद्रजी बुट्टेपाटील व उपाध्यक्ष मा. नानासाहेब टाकळकर कार्यक्रमाचे अध्यक्ष तालुक्याचे आमदार मा. श्री. बाबाजी काळे म्हणून उपस्थित होते. ज्येष्ठ संचालक हिरामण अण्णा सातकर,संचालक मा. श्री बाळासाहेब सांडभोर बाळासाहेब लिंबोरे,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच.एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे त्याचबरोबर बहिरवाडी गावचे सरपंच सौ. वसुधाताई राक्षे, मा. सभापती अंकुशशेठ राक्षे, मा. जगन्नाथशेठ राक्षे व सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक शारदाताई पवार, डॉ. दिलीप मुळूक, डॉ. योगेश वाळुंज डॉ. गणेश धुमाळ आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा मच्छिंद्र मुळूक यांनी केले.प्रास्ताविक डॉ. सुनीता जाधव यांनी व, आभार प्रा संदीप थोरात यांनी केले.

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA * RAJGURU NAGAR



Scanned by CamScanner

दिनांक 25 डिसेंबर2025 रोजी नियमित कार्यक्रमांतर्गत सकाळी सहा वाजता व्यायाम व योगासने, 07.00 वाजता प्रार्थना, ध्वजवंदन करण्यात आले. 7.30 ते 12.30 दरम्यान ग्रामपंचायत लगतची स्वच्छता करण्यात आली. तसेच स्वच्छतेबाबत पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. गावात सर्वेक्षण करण्यात आले. दुपारी 3.00 वाजता श्री.सुभाष चव्हाण पोलिस निरीक्षक राजगुरूनगर यांनी "सायबर गुन्हे व मा. श्री. आशुतोष थिगळे यांनी हॉटेल व्यवस्थापन या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. यानंतर विद्यार्थ्यांनी" हवामान बदल भारतसमोरील आव्हाने " या विषयावर गटचर्चा घेण्यात आली. तर 5 ते 6 दरम्यान शिबिर फेरी, गावातील ग्रामस्थांच्या भेटीगाठी घेण्यात आल्या. नंतर शारीरिक व बौद्धिक खेळ घेण्यात आले. 08.00 ते 10.00 दरम्यान सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. गायन, नृत्य व काव्यवाचन घेण्यात आले.

दिनांक 26 डिसेंबर 2025 रोजी नियमित कार्यक्रमांतर्गत सकाळी 06.00 वाजता व्यायाम, योगासने व 07.00 वाजता प्रार्थना आणि ध्वजवंदन करण्यात आले. 07.30 ते 12.30 दरम्यान पाणलोट क्षेत्र विकास व जलसंधारण विषयक श्रमदान करण्यात आले. पडीक जमिनीच्या व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.बालविवाह रोखण्यासाठी पथनाट्याचे सादरीकरण करून जनजागृती करण्यात आली. दुपारी एक ते दोन दरम्यान भोजन तर 03.00 वा. माननीय श्री दत्तात्रय शितोळे यांनी "कुकुट्पालन" या विषयावर मार्गदर्शन केले. तर बहिरवाडी गावच्या विद्यमान सरपंच मा. सौ. वसुधाताई अंकुश राक्षे यांनी ग्रामविकासातील आव्हाने व उपाययोजना या विषयावर मुलांशी संवाद साधला.खे. ता. शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. देवेंद्रजी बुट्टेपाटील व उपाध्यक्ष मा. श्री. नानासाहेब टाकळकर यांनी शिबिरास आकस्मित भेट दिली व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तर रात्री 08 ते 10



HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA RAJGURU NAGAR

Scanned by CamScanner

सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये भारुड व नाटक सादरीकरण करण्यात आले.

दिनांक 27 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 06.00 वाजता व्यायाम व योगासने, 07.00 वाजता प्रार्थना, ध्वजवंदन करण्यात आले. 08.30 ते 12.30 दरम्यान जलसंवर्धन व पर्यावरण संवर्धन कार्यक्रम राबविण्यात आला. सर्व विद्‌यार्थ्यांनी मिळून गावासाठी उपयुक्त पाट बंधारा बांधला.दुपारी एक ते दोन दरम्यान स्वयंसेवकाचे भोजन झाले, त्यानंतर श्री.प्रवीण शिंदे उपकृषी अधिकारी खेड व मा.श्रीमती दीपाली पवार सहाय्यक कृ. अधि. पांगरी यांनी "जलव्यवस्थापन "या विषयावर मार्गदर्शन केले. जबाबदार नागरिक घडवण्यात NSSची भूमिका या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. तर 08 ते 10 दरम्यान सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले.

दिनांक 28डिसेंबर2025 रोजी सकाळी 08.00 वाजता बहिरवाडी गावात प्रभात फेरी काढण्यात आली. गावातील सार्वजनिक रस्ते, ग्रामदैवत मंदिर परिसर, शाळा परिसर व ग्रामपंचायत परिसर स्वच्छता कार्यक्रम घेण्यात आला. गावाचे माजी सरपंच मा. श्री. जगन्नाथ राक्षे यांनी ग्रामविकासातील तरुणांची भूमिका व मा. श्री सचिन काळे यांनी आधुनिक शेती आणि उत्पन्न या विषयावर मुलांना मार्गदर्शन केले. डिजिटल युगातील संधी व धोके या विषयावर वादविवाद स्पर्धा घेण्यात आली.व रात्री सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक 29 डिसेंबर 2025 रोजी सकाळी रोजच्या प्रमाणे व्यायाम व इतर कार्यक्रम घेण्यात आले. तर 9 ते 12 दरम्यान श्रमदान करण्यात आले. एक ते दोन दरम्यान जेवण, तर मा. श्री. वाय. यू. जाधव यांचे बिबट-मानव संघर्ष आणि पर्यावरण या विषयावर व्याख्यान झाले. स्वयंसेवकाच्या कलागुणांना वाव मिळावा



HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA ★ RAJGURU NAGAR

Scanned by CamScanner

या उद्देशाने सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. गावातील महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रम घेण्यात आला. कार्यालय समोरील सभागृहात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात पोवाडा, नृत्य वादन, विविध स्पर्धा, गायन, एकपात्री नाटक, काव्यवाचन तसेच प्रादेशिक नृत्य सादर करण्यात आले. या कार्यक्रमास ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक 24 डिसेंबर2025 ते 30 डिसेंबर2025 दरम्यान शाश्वत विकासासाठी युवक-पाणलोट व पडीक जमीन व्यवस्थापन विशेष हिवाळी शिबिर अंतर्गत बहिरवाडी येथे समारोप समारंभ दिनांक 30 डिसेंबर2025 रोजी संपन्न झाला. सदरील कार्यक्रमांतर्गत सात दिवसात राबवलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. गावात घेतलेले विविध उपक्रम व केलेल्या जनजागृती बाबत सरपंच आणि उपसरपंच यांनी स्वयंसेवकांचे व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकाऱ्यांचे आभार मानले. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे जेष्ठ संचालक मा. हिरामण अण्णा सातकर पाटील, मा. बाळासाहेब सांडभोर, उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, सरपंच वसुधाताई राक्षे, श्री. जगन्नाथ शेठ राक्षे, उपसरपंच, ग्रामसेवक, महाविद्यालयातील प्राध्यापक व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रास्ताविक डॉ. सुनिता जाधव, तर आभार प्रा संदीप थोरात यांनी मानले.

डॉ. सुनीता जाधव
कार्यक्रम अधिकारी
Programme Office
National Service Scheme
Hutatma Rajguru Mahavidyalaya
Rajgurunagar

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
PRINCIPAL
Hutatma Rajguru Mahavidyalaya
(Arts, Science & Commerce)
Rajgurunagar (Pune)



HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA ★ RAJGURU NAGAR

Scanned by CamScanner